## MAHARASHTRA ACT No. II OF 1966

## MAHARASHTRA REQUISITIONING (AND CONTROL OF MOTOR VEHICLES ACT, 1965.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती दिनांक २८ जानेवारी १९६६ रोजी मिळालेली असल्यामुळे तो याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**बी. पी. दलाल,**
सचिव, महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. II OF 1966

## AN ACT TO PROVIDE FOR THE REQUISITIONING AND CONTROL OF MOTOR VEHICLES IN CERTAIN EMERGENT CIRCUMSTANCES.

## सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २

[ राष्ट्रपती यांची समती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दिनांक ५ फेब्रुवारी १९६६ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला. ]

**विशिष्ट निकडीच्या परिस्थितीत मोटर वाहनांचे अधिग्रहण करण्यासाठी व त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी तरतूद करण्याबाबत अधिनियम.**

ज्याअर्थी, विशिष्ट निकडीच्या परिस्थितीत मोटर वाहनांचे अधिग्रहण करण्याची व त्यांच्या वापरावर नियंत्रण ठेवण्याची व तत्संबंधित इतर बाबींसाठी तरतूद करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या सोळाव्या वर्षी याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

१. (१) या अधिनियमास महाराष्ट्र मोटर वाहनांचे अधिग्रहण (आणि नियंत्रण) अधिनियम, १९६५ असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

(२) तो सबंध महाराष्ट्र राज्यास लागू होईल.

(३) तो, राज्य शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे जी तारीख नेमील त्या तारखेस अमलात येईल.

२. संदर्भावरून दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, ह्या अधिनियमात,— व्याख्या.

(अ) "मोटर वाहन" किंवा "वाहने" —मग ते इतर वाहने ओढण्याकरिता किंवा अन्य कारणाकरिता वापरण्यात येत असो वा नसो—याचा अर्थ मार्ग परिवहनाच्या प्रयोजनाकरिता वापरण्यात येणारे किंवा वापरण्यायोग्य असलेले यंत्रचलित असे कोणतेही वाहन, असा समजावा.

(ब) "मालक" या संज्ञेत, मोटर वाहन ज्याच्या कबजात असेल तो इसम अल्पवयी असल्यास, अशा अल्पवयी इसमाच्या पालकाचा आणि जे मोटर वाहन भाडेखरेदी कराराचा विषय असेल त्या मोटर वाहनाच्या संबंधात त्या करारान्वये ते वाहन ज्याच्या कबजात असेल त्या इसमाचा समावेश होतो ;

(क) "विहित" म्हणजे ह्या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या नियमांनी विहित केलेले.

मोटर वाहनांचे अधिग्रहण.

३. (१) सामाजिक जीवनास अत्यावश्यक असलेल्या सेवा व पुरवठा चालू ठेवण्यासाठी, सार्वजनिक शांततेच्या रक्षणासाठी किंवा गंभीर स्वरूपाच्या अवर्षणामुळे, पुरामुळे, आगीमुळे किंवा इतर नैसर्गिक आपत्तीमुळे उद्‌भवलेल्या दुर्दशेमध्ये सहाय्यता देण्यासाठी राज्य शासनाच्या मते, तसे करणे आवश्यक किंवा इष्ट असेल तर, राज्य शासनाला लेखी आदेशाद्वारे कोणत्याही मोटर वाहनाचे अधिग्रहण करता येईल आणि अशा अधिग्रहणाच्या संबंधात त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटतील असे आणखी आदेश देता येतील.

(२) राज्य शासनाने पोट-कलम (१) अन्वये कोणत्याही मोटर वाहनाचे अधिग्रहण केले असेल तेव्हा, ते वाहन अधिग्रहणाच्या मुदतीपर्यंत राज्य शासनाकडे निहित राहील आणि शासनाला इष्ट वाटेल अशा रीतीने त्याचा उपयोग किंवा त्याबाबत व्यवहार करता येईल.

(३) राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही इसमास कोणत्याही वाहनाच्या संबंधात ह्या कलमान्वये कोणताही आदेश देण्यात यावा की काय आणि तसे केल्यास तो कोणत्या रीतीने दिला पाहिजे ते ठरविण्यासाठी, किंवा ह्या कलमान्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाचे पालन करण्यासाठी, कोणत्याही वाजवी वेळी कोणत्याही जागेत प्रवेश करता येईल आणि त्या जागेत किंवा त्या जागेवर असलेल्या अशा कोणत्याही वाहनांची तपासणी करता येईल.

अधिग्रहणातून मुक्तता.

४. (१) राज्य शासनाला निकटपूर्वीच्या कलमान्वये अधिग्रहण केलेले कोणतेही वाहन कोणत्याही वेळी अधिग्रहणातून मुक्त करता येईल, आणि वाजवी उपयोग करण्यात आल्यामुळे जे कोणतेही फेरफार झाले असतील त्यांस अधीन राहून, त्याने ते वाहन ज्यावेळी ताब्यात घेतले त्यावेळी ते ज्या स्थितीत होते त्याच स्थितीत शक्यतोवर ते परत दिले पाहिजे.

(२) जेव्हा कोणतेही वाहन अधिग्रहणातून मुक्त करावयाचे असेल तेव्हा राज्य शासनाला कोणत्याही बाबतीत जी कोणतीही चौकशी करणे किंवा करविणे त्यास आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, ज्या इसमास त्या वाहनाचा कबजा दिला पाहिजे असा इसम लेखी आदेशाद्वारे निर्दिष्ट करता येईल.

(३) पोट-कलम (२) अन्वये दिलेल्या आदेशात निर्दिष्ट केलेल्या इसमास अधिग्रहण केलेल्या वाहनांचा कबजा दिल्यानंतर राज्य शासनाची अशा मालमत्तेच्या संबंधात सर्व जबाबदारीतून पूर्णपणे मुक्तता होईल आणि असे अधिग्रहण संपुष्टात येईल :

परंतु, या कलमातील कोणत्याही मजकुरामुळे, ज्या इसमास त्या मालमत्तेचा कबजा अशा रीतीने देण्यात आला असेल त्या इसमाविरुद्ध अशा मालमत्तेच्या संबंधात इतर कोणत्याही इसमास योग्य कायदेशीर इलाज करून जे हक्क बजाविण्याचा अधिकार असेल अशा कोणत्याही हक्कांस बाध येणार नाही.

(४) अधिग्रहण केलेले कोणतेही वाहन ज्या इसमाच्या कबजात द्यावयाचे असेल असा इसम जेव्हा आढळत नसेल आणि त्याचा कोणताही वैध अभिकर्ता नसेल किंवा त्याच्या वतीने त्या वाहनाचा कबजा घेण्याचा अधिकार दिलेला इतर कोणताही इसम नसेल तेव्हा राज्य शासनाने ते वाहन अधिग्रहणातून मुक्त झाले आहे असे जाहीर करणारी नोटीस शासकीय राजपत्रात प्रसिद्ध करण्याची व्यवस्था केली पाहिजे.

(५) जेव्हा अशी नोटीस शासकीय राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येईल तेव्हा, अशा नोटिशीत निर्दिष्ट केलेले वाहन अशा रीतीने नोटीस प्रसिद्ध केल्याच्या तारखेस व त्या तारखेपासून अधिग्रहणाच्या अधीन असण्याचे बंद होईल आणि त्याचा कबजा मिळण्याचा हक्क असलेल्या इसमाच्या ते स्वाधीन करण्यात आले आहे असे मानण्यात आले पाहिजे आणि अशा तारखेनंतरच्या कोणत्याही मुदतीबद्दल अशा मालमत्तेच्या संबंधात कोणतीही नुकसानभरपाई किंवा इतर मागण्या याबाबत राज्य शासन जबाबदार असणार नाही.

५. (१) कोणत्याही मोटर वाहनाच्या अधिग्रहणाच्या बाबतीत द्यावयाची नुकसानभरपाई ही पुढील बाबींची एकूण बेरीज असेल :— अधिग्रहण केल्याबद्दल नुकसान-भरपाई.

(एक) मालकाने ते वाहन ज्या किमतीस खरेदी केले असेल त्या किमतीवर, सर्व वर्गाच्या किंवा कोणत्याही वर्गाच्या मोटर वाहनासाठी विहित करण्यात येईल अशा रीतीने आणि दरसाल दर शेकडा ३ टक्क्यांपेक्षा कमी नसेल व ६ टक्क्यांपेक्षा अधिक नसेल अशा दराने, हिशेब केलेले व्याज :

परंतु, जर मालकाला ते वाहन देणगी म्हणून मिळाले असेल किंवा त्यास राज्य शासनाची खात्री होईल अशा रीतीने त्याची किमत ठरविता येत नसेल किंवा त्याची किमत बदली वाहनाच्या चालू किमतीपेक्षा अधिक होत असेल तर त्या वाहनाची किंवा राज्य शासनाच्या मते जे वाहन वस्तुत: त्या वाहनासारखे असेल अशा वाहनाची चालू किमत हीच त्या वाहनाची किमत आहे असे समजण्यात येईल ;

(दोन) सर्व वर्गाच्या किंवा कोणत्याही वर्गाच्या मोटर वाहनांसाठी विहित करण्यात येईल अशा रीतीने आणि दरसाल दर शेकडा ३० टक्क्यांहून अधिक नसेल अशा दराने हिशेब केलेली वाहनाच्या अधिग्रहणाच्या मुदतीत वाहनाच्या घसाऱ्याची रक्कम ;

(तीन) वाहनाचा उपयोग न करता आल्यामुळे किंवा त्याचे अधिग्रहण केले नसते तर जो नफा मिळाला असता तो न मिळाल्यामुळे जे नुकसान झाले असेल त्याबद्दल, वरील खंड (दोन) मध्ये दिलेल्या दराने अशा प्रकारे विहित करण्यात येईल अशा रीतीने व अशा मुदतीसाठी हिशेब केलेली घसाऱ्याची रक्कम वजा जाता, वरील खंड (एक) मध्ये उल्लेख केलेल्या किमतीच्या दरसाल दर शेकडा ३ टक्क्यांहून कमी नसेल अशी विहित करण्यात येईल अशा शेकडा प्रमाणातील रक्कम ;

(चार) राज्य शासन सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे निर्दिष्ट करील अशी आणखी कोणतीही रक्कम :

परंतु, अधिग्रहणाच्या मुदतीत त्या वाहनाचे सर्वसामान्य वापराव्यतिरिक्त इतर कारणांमुळे नुकसान झाले असेल किंवा ज्या अवधीत त्याचा विमा उतरविण्यात आला नसेल अशा अवधीत ते हरवले असेल तर मालकास, असे नुकसान भरून काढण्यासाठी जो खर्च येईल त्या खर्चाइतकी रक्कम किंवा संपूर्ण नुकसान झाले असेल अशा बाबतीत अशी मालमत्ता हरवल्याच्या तारखेस संपादन करण्यात आली असता जी नुकसानभरपाई देण्याजोगी असेल त्या नुकसानभरपाईइतकी रक्कम ही जादा नुकसानभरपाई म्हणून देण्यात आली पाहिजे आणि अशी नुकसानभरपाई ही विहित केलेल्या रीतीने ठरविण्यात येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये ठरविण्यात आलेल्या नुकसानभरपाईच्या रकमेमुळे मालकावर अन्याय झाला असेल तेव्हा त्यास, राज्य शासनाने ह्या बाबतीत नियुक्त केलेल्या लवादाकडे ही बाब सोपविण्यासाठी, विहित करण्यात येईल अशा मुदतीत आणि अशा नमुन्यात व अशा रीतीने राज्य शासनाकडे अर्ज करता येईल. असा लवादी इसम हा न्यायिक अनुभव असलेला इसम असेल. देण्यात येणारी नुकसानभरपाईची रक्कम ही लवादाकडून पोट-कलम (१) अनुसार ठरविण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

(३) नुकसानभरपाई मिळण्याच्या हक्कासंबंधी किंवा नुकसानभरपाईच्या रकमेच्या संविभाजना-संबंधी कोणताही वाद असेल तेव्हा, तो वाद राज्य शासनाने या बाबतीत नियुक्त केलेल्या अशा लवादाकडे निर्णयासाठी सोपविण्यात आला पाहिजे आणि अशा लवादाच्या निर्णयास अनुसरून त्याचा निर्णय करण्यात आला पाहिजे.

(४) पोट-कलम (२) किंवा (३) अन्वये लवादाने दिलेला कोणताही निर्णय अंतिम असेल.

६. कोणत्याही मोटर वाहनाचे अधिग्रहण करण्यासाठी निकटपूर्वीच्या कलमान्वये ठरविण्यात आलेली नुकसानभरपाईची रक्कम विहित करण्यात येईल अशा मुदतीत, अशा कालांतराने त्या रीतीने देण्यात येईल : नुकसान-भरपाई देणे.

परंतु नुकसानभरपाई देण्यास अशा रीतीने विहित केलेल्या मुदतीबाहेर विलंब झाला असेल तर अशा बाबतीत, बाकी राहिलेल्या रकमेवर किंवा त्या रकमेच्या भागावर, विहित करण्यात येईल अशा दरसाल दर शेकडा ३ टक्क्यांहून कमी नसेल किंवा ६ टक्क्यांहून अधिक नसेल अशा दराने व अशा तारखेपासून किंवा तारखांपासून, व्याज देण्यात येईल.

माहिती वगैरे मागविण्या-संबंधीची शक्ती.

७. राज्य शासन, कोणतेही मोटर वाहन अधिग्रहण करण्याच्या किंवा त्यासाठी देण्याजोगी नुकसानभरपाई ठरविण्याच्या किंवा यापूर्वीच्या उपबंधांना अनुसरून इतर कोणतीही कारवाई करण्याच्या हेतूने, लेखी आदेशाद्वारे—

(अ) उपरोक्त उपबंध अंमलात आणण्यासाठी जी माहिती व जे दस्तऐवज वाजवीरीत्या आवश्यक असतील अशी, त्या आदेशात निर्दिष्ट असेल त्या वाहनासंबंधी कोणत्याही इसमास असलेली माहिती व त्याच्या ताब्यात असलेले दस्तऐवज अशा आदेशात निर्दिष्ट करण्यात येईल अशा मुदतीत किंवा कालांतराने त्याजकडे किंवा आदेशात विहित करण्यात येईल अशा प्राधिकाऱ्याकडे सादर करण्यास त्यास अनिवार्य करू शकेल.

(ब) त्या मालमत्तेच्या मालकाने किंवा त्या मालमत्तेच्या प्रभारी असलेल्या इसमाने, निर्दिष्ट करण्यात येईल अशी मुदत संपेपर्यंत राज्य शासनाच्या परवानगीशिवाय तिची विल्हेवाट लावता कामा नये किंवा ती ज्या जागेत ठेवलेली असेल त्या जागेतून ती हलविता कामा नये किंवा त्या वाहनाचे कोणतेही टायर्स, ट्यूब्स, उपसाधने किंवा त्याचे भाग हलविता कामा नये, असा निदेश देऊ शकेल.

अधिग्रहण करण्याबाबत-कोणत्या-ही आदेशाचे उल्लंघन करण्याबद्दल शास्ती.

८. जर कोणताही इसम कलम ३ किंवा कलम ७ अन्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाचे उल्लंघन करील, तर त्यास दोषी ठरविण्यात आल्यावर पराकाष्ठा एक वर्षाच्या कैदेची शिक्षा किंवा दंडाची शिक्षा देण्यात येईल किंवा या दोन्ही शिक्षा देण्यात येतील.

मोटर वाहनांचे नियंत्रण.

९. (१) सामाजिक जीवनास अत्यावश्यक असलेल्या सेवा व पुरवठा चालू ठेवण्यासाठी, सार्वजनिक शांततेच्या रक्षणासाठी किंवा गंभीर स्वरूपाच्या अवर्षणामुळे, पुरामुळे, आगीमुळे किंवा इतर नैसर्गिक आपत्तीमुळे उद्‌भवलेल्या दुर्दशेमध्ये सहायता देण्यासाठी राज्य शासनाच्या मते तसे करणे आवश्यक किंवा इष्ट असेल तर, राज्य शासनाला ह्या अधिनियमाच्या इतर उपबंधास हानी न पोचविता सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे, अशा आदेशात विहित करण्यात येईल अशा क्षेत्रात व अशा मुदतीसाठी,—

(अ) मार्ग परिवहनाच्या प्रयोजनासाठी कोणत्याही मोटर वाहनाच्या वापराचे किंवा अशा मोटर वाहनाच्या विक्रीचे किंवा खरेदीचे नियमन करता येईल, त्यावर निर्बंध घालता येतील किंवा त्यासंबंधी निदेश देता येतील ;

(ब) कोणतेही मोटर वाहन ज्याच्या मालकीचे असेल किंवा ज्याच्या कबजात किंवा नियंत्रणाखाली असेल अशा कोणत्याही इसमास (ज्याचा यापुढे या कलमात " उक्त इसम " असा उल्लेख केला आहे), या बाबतीत निर्दिष्ट करण्यात आलेल्या कोणत्याही इसमास, अशा वाहनाच्या बाबतीत आदेशात निर्दिष्ट करण्यात येईल असा तपशील देणारे एक विवरणपत्र सादर करण्यास भाग पाडता येईल आणि त्यात निर्दिष्ट करण्यात येईल अशा रीतीने ते विवरणपत्र पडताळून पाहण्यास भाग पाडता येईल ;

(क) उक्त, इसमास, त्या मोटर वाहनांची विल्हेवाट लावण्यापूर्वी किंवा ते आपल्या कबजातून किंवा नियंत्रणातून जाऊ देण्यापूर्वी, आदेशात निर्दिष्ट करण्यात येईल अशा रीतीने सूचना देण्यास भाग पाडता येईल;

(ड) उक्त इसमास किंवा कोणत्याही मोटर वाहनाच्या संबंधात कामावर लावलेल्या कोणत्याही इसमास, आदेशात निर्दिष्ट केलेल्या किंवा आदेशास अनुसरून योग्य रीतीने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही इसमाने दिलेल्या कोणत्याही निदेशांचे पालन करण्यास भाग पाडता येईल; आणि अशा निदेशांद्वारे उक्त इसमास किंवा कामावर लावलेल्या अशा इसमास, त्या निदेशात नमूद करण्यात येईल अशा वेळी व अशा मार्गांनी त्यात नमूद करण्यात येतील अशा इसमांच्या किंवा मालाच्या वाहतुकीसाठी, त्या वाहनाचा उपयोग करण्यास भाग पाडता येईल ;

(इ) ज्या शर्तींना अधीन राहून, आणि ज्या दराने मार्गपरिवहनाच्या प्रयोजनासाठी कोणतेही मोटर वाहन भाड्याने देता येईल आणि माणसांची किंवा मालाची रस्त्याने वाहतूक करता येईल आणि ज्या शर्तींना अधीन राहून अशा रीतीने वाहून नेलेला किंवा न्यावयाचा माल उतरविता येईल किंवा भरता येईल, त्या शर्ती विहित करता येतील ;

(फ) कोणत्याही विशिष्ट मोटर वाहनामधून किंवा कोणत्याही विशिष्ट मार्गाने किंवा कोणत्याही निष्कासगृहाकडे किंवा आगाराकडे (डेपो) माणसांच्या किंवा मालाच्या वाहतुकीसंबंधी निदेश देण्यासाठी तरतूद करता येईल ;

(ग) ज्या प्राथम्यक्रमानुसार माणसांची व मालाची रस्त्याने वाहतूक करावयाची असेल आणि मार्गपरिवहनाच्या प्रयोजनासाठी वाहने वापरावयाची असतील त्या प्राथम्यक्रमाचे नियमन करण्याची तरतूद करता येईल ;

(ह) मार्गपरिवहनाच्या संबंधात राज्य शासनाला आवश्यक किंवा इष्ट वाटतील अशा इतर तरतुदी करता येतील.

(२) कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास किंवा राज्य शासनाने ह्याबाबतीत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही इतर इसमास असे सकारण वाटत असेल की पोट-कलम (१) अन्वये दिलेल्या आदेशाचे उल्लंघन करून कोणतेही मोटर वाहन कोणत्याही इमारतीत, जमिनीवर किंवा इतर जागेत किंवा त्यावर आहे किंवा कोणत्याही इसमाने ठेवलें आहे किंवा कोणताही इसम त्याचा उपयोग करीत आहे तर, अशा अधिकाऱ्यास किंवा इसमास,—

(अ) अशा कोणत्याही जागेत प्रवेश करता येईल व झडती घेता येईल, आणि आदेशाचे उल्लंघन करून कोणतेही मोटर वाहन त्यामध्ये किंवा त्यावर आहे असा त्यास संशय असेल असे त्या ठिकाणी सापडलेले कोणतेही मोटर वाहन जप्त करता येईल ;

(ब) अशा इसमास थांबवता येईल व आदेशाचे उल्लंघन करून उपयोग करण्यात येत असलेले कोणतेही मोटर वाहन जप्त करता येईल.

(३) जर कोणताही इसम, ह्या कलमास अनुसरून दिलेल्या कोणत्याही आदेशाचे उल्लंघन करील तर त्यास, दोषी ठरविण्यात आल्यावर, पराकाष्ठा सहा महिने मुदतीच्या कैदेची शिक्षा होईल किंवा दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

१०. या अधिनियमामध्ये अन्यथा स्पष्टपणे जी तरतूद करण्यात आली असेल ती खेरीज करून, आदेश व या अधिनियमाच्या उपबंधान्वये दिलेला कोणताही आदेश किंवा काढलेली कोणतीही नोटीस ही, ते वाहन ज्या इसमाच्या कबजात असेल किंवा नियंत्रणाखाली असेल त्या इसमावर बजावण्यात आली असेल तर ती मोटर वाहनाच्या मालकावर बजावण्यात आली आहे असे समजण्यात आले पाहिजे. नोटिसा बजावणे.

११. राज्य शासनाला शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे असा निदेश देता येईल की (नियम करण्याच्या शक्तीव्यतिरिक्त) या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधान्वये त्या शासनाला प्रदान केलेल्या कोणत्याही शक्ती किंवा त्याजकडे सोपविलेली कोणतीही कर्तव्ये ही, निदेशामध्ये व कोणत्याही शर्ती निर्दिष्ट करण्यात आल्यास अशा शर्ती अन्वये, अशा रीतीने निर्दिष्ट करण्यात येईल अशा उप-जिल्हाधिकारी किंवा कार्यकारी अभियंता, किंवा पोलीस उप-आयुक्त याच्या दर्जाहून कमी दर्जाचा नसेल अशा अधिकाऱ्याकडून किंवा अधिकाऱ्यांच्या वर्गाकडूनदेखील बजावण्यात येतील किंवा पार पाडण्यात येतील. राज्य शासनाच्या शक्ती व कर्तव्ये सोपविणे.

या अधिनियमान्वये केलेल्या कार्यवाहीचे संरक्षण.

१२. (१) या अधिनियमानुसार किंवा तदन्वये केलेल्या कोणत्याही नियमानुसार किंवा आदेशानुसार सद्भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचे राहून गेलेल्या कोणत्याही गोष्टींबद्दल कोणत्याही इसमाविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर वैध कार्यवाही करता येणार नाही.

(२) या अधिनियमानुसार किंवा तदन्वये केलेल्या कोणत्याही नियमानुसार किंवा आदेशानुसार सद्भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचे राहून गेलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे झालेल्या किंवा होण्याचा संभव असलेल्या कोणत्याही नुकसानीबद्दल राज्य सरकारविरुद्ध कोणताही दावा किंवा इतर वैध कार्यवाही करता येणार नाही.

नियम करण्याची शक्ती.

१३. (१) शासकीय राजपत्रात अधिसूचना देऊन, राज्य शासनाला या अधिनियमान्वये नियम बनविण्याच्या शक्तीचा वापर करता येईल.

(२) पूर्ववर्ती उपबंधातील नियम करण्याच्या कोणत्याही शक्तीस हानी न पोचविता राज्य शासनाला सर्वसाधारणपणे या अधिनियमाचे उद्देश पार पाडण्यासाठी त्याच्याशी सुसंगत असे नियम करता येतील.

(३) या अधिनियमान्वये केलेले सर्व नियम हे पूर्व प्रसिद्धीच्या शर्तीस अधीन असतील.

(४) या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनांत एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात आला पाहिजे ; आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगेच नंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरफार करण्यात दोन्ही सभागृहांची संमती असल्यास किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहांची संमती असल्यास तो नियम अशा निर्णयाची अधिसूचना शासकीय राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून यथास्थिति केवळ अशा सुधारलेल्या स्वरूपातच अंमलात येईल किंवा तो अमलात येणार नाही ; तथापि, अशा कोणत्याही फेरफारामुळे किंवा रद्द करण्यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे राहून गेलेल्या कोणत्याही गोष्टीच्या वैधतेस बाध येणार नाही.

(यथार्थ अनुवाद)

**वा. ना. पंडित,**

भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.